o/c


**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**राष्ट्रीय महामार्ग विभाग, पेण-रायगड**
**पिन कोड नं. ४०२ १०७**


| | | |
|---|---|---|
| फोन नं. ०२१४३-२५६८६० | ईमेल :- eenhpen@gmail.com | वेबसाईट :- http://www.mahapwd.com |
| जा. क्र. रामवि / पेण / प्रशा ५/ पेण खोपोली / 1236 | | दिनांक :- २१/०७/२०२२ |

प्रती,
उप वन संरक्षक
वन विभाग अलिबाग

**विषय :-** Rehabilitation and Upgradation existing Highway to 2 Lane / 4 Lane with paved shoulder under configuration from Pen - Khopoli – Mahad ( Km 00+000 to Km 33+328) section of NH- 166 D ( Pen - Khopoli - Mahad ) on EPC mode in the state of Maharashtra

- पेण - खोपोली - महड (कि.मी ०.००० ते कि.मी. ३३.३२८) सेक्शन ऑफ एनएच १६६ डी मधील रस्त्याचे रुंदीकरणाकरीता वनजमिन मागणी प्रस्ताव.

**संदर्भ :-**
१. या कार्यालयाकडील पत्र क्र. रामवि/पेण /प्रशा ५ / पेण खोपोली/१५४६, दि. २१/०७/२०२०
२. या कार्यालयाकडील पत्र क्र. रामवि/पेण /प्रशा ५ / पेण खोपोली/२१०६, दि. ०८/१०/२०२०
३. या कार्यालयाकडील पत्र क्र. NHD / Pen/PKM/Forest/PB-५/२४०९ Date-२३/११/२०२०.
४.आपले कडील पत्र क्र. ब / २० / जमीन/२१५४, दि. २५/११/२०२०
५.आपले कडील पत्र क्र. ब/२० / जमिन / २७३२, दिनांक २४/१२/२०२०.
६. या कार्यालयाकडील पत्र क्र. NHD / Pen/PKM/Forest/PB-५/८३५, दि. २३/०४/२०२१.
७.आपले कडील पत्र क्र. ब / २० / जमिन/वसं/५६९, दिनांक २४/०५/२०२१.
८. आपले कडील पत्र क्र. ब/२०/जमिन/वसं/ ७५७, दिनांक ०३/०६/२०२१.
९. या कार्यालयाकडील पत्र क्र. NHD / Pen / PKM/Forest/PB-५/११११, दि. १७/०६/२०२१.
१०. आपले कडील पत्र क्र. ब/२०/जमिन/वसं /१२९९, दिनांक १०/०७/२०२१.
११. या कार्यालयाकडील पत्र क्र. NHD / Pen / PKM / Forest/PB-५/१८४२, दि. २१/१०/२०२१.
१२. आपले कडील पत्र क्र. ब / २० / जमिन/वसं/४२९०, दिनांक २८/०१/२०२२.
१३. या कार्यालयाकडील पत्र क्र. NHD / Pen / Forest/PB-५/४८८, दि. २५/०३/२०२२.
१४.आपले कडील पत्र क्र. ब / २० / जमिन/वसं/१३२७/२०२२-२३, दिनांक ०६/०७/२०२२.

उपरोक्त विषयांकीत कामास केंद शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली असून मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग (सा. बां.) महाराष्ट्र यांनी सदर कामाचे कार्यारंभ आदेश मे. जे. एम. म्हात्रे इन्फ्रा प्रा. लि. पनवेल यांना देण्यात आले असून हे काम प्रगती पथावर आहे.

उपरोक्त विषयांकीत कामी या कार्यालयामार्फत पेण - खोपोली - महड (कि.मी ०.००० ते कि.मी. ३३.३२८) सेक्शन ऑफ एनएच १६६ डी मधील रस्त्याचे रुंदीकरणाकरीता वनजमिन मागणी प्रस्ताव दि. १२.०४.२०२१ रोजी परिवेश पोर्टलवरऑनलाईन सादर करण्यात आला आहे. तसेच सदर प्रस्ताव दि. २३.०४.२०२१ रोजी या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र ६ अन्वये हार्ड कॉपी मध्ये आपल्या कार्यालयास सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाबाबत आपल्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रास अनुसरून तृटी पूर्तता करून प्रस्ताव या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र ११ अन्वये फेर सादर करण्यात आला. तद्नंतर आपल्या कार्यालयाकडून पुनश्चः प्राप्त झालेल्या पत्रास अनुसरून तृटी पूर्तता करून प्रस्ताव या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र १३ अन्वये फेर सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावाबाबत आपल्या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र १४ अन्वये पुनश्चः तृटी उपस्थित करण्यात आल्या असून याची मुद्दे निहाय पूर्तता खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

जावक लिपीक
उप वनसंरक्षक
अलिबाग यांचे कार्यालय
26/7/2022

Scanned with Cam

| क्र | त्रुटी | खुलासा / पूर्तता |
| --- | --- | --- |
| १ | प्रस्तावित आखणी मार्गात बाधीत होणारे मौजे रामराज आंबेघर, सापोली, पिंपळगांव, गागोदे खुर्द, ता. पेण व मौजे करंबेळी तर्फे छातिशी, रानसई, होराळे, आपटी, डोणवत, तांबाटी, दहिवली तर्फे वेरेटी, वडवळ, ता. खालापूर गावात समाविष्ट असलेले वनक्षेत्र त्याचे वैधानिक दर्जानिहाय क्षेत्र दर्शविलेले नाही ते दर्शविणे आवश्यक आहे. | प्रस्तावित आखणी मार्गात बाधीत होणारे नमूद केलेल्या गावात वनक्षेत्र त्याचे वैधानिक दर्जानिहाय क्षेत्र दर्शविलेले आहे. |
| २ | प्रस्तावात आखणी मार्गात बाधीत होणारे मौजे तरणखोप गावाचा नवीन / जुना गाव झाल्याचे फेरफार / सुची तपशील सादर करणे आवश्यक आहे. | मौजे तरणखोप गावाचा नवीन / जुना गाव झाल्याचे फेरफार / सुची तपशील सादर करण्यात येत आहे. सोबत नकाशा सादर करण्यात आला आहे. |
| ३ | मौजे तरणखोप, ता. पेण येथील सर्व्हे क्रमांक ३२ मधून रस्ता दर्शविलेला आहे. परंतु सर्व्हे क्रमांकाचे क्षेत्र क्षेत्रविवरण तक्तयांत नमुद केलेले दिसून येत नाही. | मौजे तरणखोप, ता. पेण येथील सर्व्हे क्रमांक ३२ चे क्षेत्र क्षेत्रविवरण तक्तयांत (वनेत्तर) नमुद केलेले आहे. सोबत नकाशा सादर करण्यात आला आहे. |
| ४ | मौजे धावटे मधील सर्व्हे नंबर १६ मधून रस्त्याचा आखणी मार्ग बाधीत होत नाही. परंतु क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये नमूद केल्याचे दिसून येत नाही. तरी याबाबत खात्री होणे आवश्यक आहे. | मौजे धावटे सर्व्हे नंबर १६ चे क्षेत्र विवरण तक्त्यामधून वगळण्यात आले असून. बाधीत होत नसल्याचा नकाशा सोबत सादर करण्यात आला आहे. |
| ५ | मौजे धावटे, ता. पेण मधील सर्व्हे नंबर ४०, ११, ७९, ७२. चे रस्त्यामधून जात आहे. परंतू क्षेत्र विवरणामध्ये नमूद केलल्याचे दिसून येत नाही. तरी याबाबत खात्री होणे आवश्यक आहे. | मौजे धावटे सर्व्हे नंबर ४०, ११, ७९, ७२ च्या क्षेत्राची खात्री (वनेत्तर) करण्यात आली असून सोबत नकाशा सोबत सादर करण्यात आला आहे. |
| ६ | मौजे सावसरसई ता. पेण सर्व्हे नंबर ७ चा पोट हिस्सा नकाशा सादर करणे आवश्यक आहे. | मौजे सावसरसई ता. पेण सर्व्हे नंबर ७ चा पोट हिस्सा नकाशा सोबत सादर करण्यात आला आहे. |
| ७ | मौजे सावरसई, ता. पेण संपादित वन सर्व्हे नंबर ७ चे लगत उजव्या बाजुला आखणी मार्गाची मार्कीग दिसून येत नाही. तरी याबाबत खात्री होणे आवश्यक आहे. | मौजे सावरसई सर्व्हे नंबर ७ चे लगत केवळ डाव्या बाजुस वन क्षेत्र आहे. सुधारित आखणी नकाशा सोबत सादर करण्यात आला आहे. |
| ८ | मौजे कामार्ली, ता. पेण येथील राखीव वन सर्व्हे क्रमांक ४४ मधून जात आहे. सदर डाव्या बाजूच्या रस्त्याची लांबी क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये ५६५ मीटर दिसून येत आहे. परंतू नकाशाप्रमाणे मोजली असता ६२० मीटर असल्याचे दिसून येत आहे. तरी यबाबत खात्री होणे आवश्यक आहे. | मौजे कामार्ली सर्व्हे क्रमांक ४४ नकाशाप्रमाणे मोजली असता ६२० मीटर असल्याने सोबत नकाशा सादर करण्यात आला आहे. |
| ९ | मौजे आंबिवली आजिवली गावाचे मुळ महसूल गांव नमुद करणे आवश्यक आहे. | मुळ महसूल गांव मौजे आजिवली असे नाव नकाशात नमुद करण्यात आले आहे. |
| १० | प्रस्तावित आखणी मार्गात बाधीत होणा-या क्षेत्रात जुना / नवीन वाढीव महसूली गांव निर्माण झाल्यास त्याचा तपशील सादर करणे आवश्यक आहे. | प्रस्तावित आखणी मार्गात वाढीव महसूली गांव केवळ मौजे आजिवली निर्माण झाल्याचे आढळून आले असल्याने त्याचा तपशील सादर करण्यात आला आहे. |
| ११ | चेक लिस्ट मुद्दा क्रमांक २a (iii), (v), (vi) त्याची पुर्तता केल्याचे दिसून येत नाही. | चेक लिस्ट मुद्दा क्रमांक २a (iii), (v), (vi) सुधारित करून सोबत सादर करण्यात आले आहे. |
| १२ | प्रकल्पयंत्रणेकडून प्रस्तावित आखणी मार्गात बाधीत होणा-या प्रत्येक गाव नकाशावर रस्त्याचा आखणीमार्ग चेनेजवार दर्शवून स्वतंत्र नकाशे सादर करणे आवश्यक आहे. | प्रस्तावित आखणी मार्गात बाधीत होणा-या प्रत्येक गाव नकाशावर रस्त्याचा आखणीमार्ग चेनेजवार दर्शवून स्वतंत्र नकाशे सोबत सादर करण्यात आले आहेत. |
| १३ | प्रस्तावित आखणी मार्गात बाधीत होणा-या गावांचे Geo Digital Map स्वतंत्र जोडणे आवश्यक आहे. | या कार्यालयाकडील पत्र क्र. NHD / Pen / Forest/ PB-५/४८८, दि. २५/०३/२०२२ अन्वये सर्व गावांचे Geo Digital Map यापूर्वीच सादर करण्यात आले आहेत. |
| १४ | १:५०००० या प्रमाणातील टोपोशीट नकाशावर नियोजीत आखणी मार्गापासून नजीकचे अभयारण्याचे व पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (ESZ) क्षेत्राचे अंतर दर्शविलेले नाही. ते दर्शविणे आवश्यक आहे. | १:५०००० या प्रमाणातील टोपोशीट नकाशावर नियोजीत आखणी मार्गापासून नजीकचे अभयारण्याचे व पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (ESZ) क्षेत्राचे अंतर दर्शवून नकाशे सोबत सादर करण्यात आले आहेत. |
| १५ | प्रस्तावासोबत वन जमिन मागणी सुधारीत KML File / Shape File ची CD जाडलेली नाही. तरी त्याची पूर्तता होणे आवश्यक आहे. | वन जमिन मागणी सुधारीत KML File ची CD सोबत जाडलेली आहे. |
| १६ | तसेच प्रस्तावित गावांची यादी साखळी प्रमाण नुसार जोडणे व गाव नकाशावर साखळी प्रमाण योग्य दर्शविणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाकडील अभिलेख हा जुन्या सर्व्हे नंबर प्रमाणे आहे व प्रस्तावासोबत जोडलेले गाव नकाशे नवीन गट | या कार्यालयाकडील पत्र क्र. NHD / Pen / Forest/ PB-५/४८८, दि. २५/०३/२०२२ अन्वये संबंधित गावांचे प्रस्तावित गावांची साखळी प्रमाण नुसार यादी गाव नकाशावर साखळी प्रमाण दर्शवून, समाविष्ट गट नंबरचे |

Scanned with Cam

| | | |
|---|---|---|
| | नंबर प्रमाणे आहेत. त्यामुळे प्रस्तावामध्ये समाविष्ट गट नंबरचे भूमी अभिलेख विभागाकडील साक्षांकीत गट एकत्रिकरण योजना व महसूल अधिकार अभिलेखातील ७/१२ उतारे प्रस्तावात सामील करणे आवश्यक आहे. | भूमी अभिलेख विभागाकडील साक्षांकीत गट एकत्रिकरण योजना व महसूल अधिकार अभिलेखातील ७/१२ उतारे यापूर्वीच सादर करण्यात आलेले आहेत. तथापि ७/१२ उतारेची अतिरिक्त प्रती सोबत जोडण्यात येत आहेत. |
| १७ | प्रस्तावात १ ते ५७ बाबीची परिपूर्ण चेकलिस्ट सामील करणेबाबत कळविण्यता आले होते त्याची पूर्तता करणेत आलेली नाही. | १ ते ५७ बाबींची परिपूर्ण चेकलिस्ट सोबत सादर करण्यात आली आहे. |
| १८ | प्रस्तावात सामील करण्यात आलेले ७/१२ उतारे हे संबंधीत प्राधीकरणाकडून / ऑनलाईन प्राप्त केलेले प्रमाणीत असणे (डीजीटल स्वाक्षरीचे) सामील करणेबाबत कळविण्यात आलेले होते तथापी याबाबत भूतता करणेत आलेली नाही. | वन क्षेत्र व वन अन्य क्षेत्राचे डीजीटल स्वाक्षरीचे ७/१२ उतारे सोबत सादर करण्यात आले आहेत. |
| १९ | प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर या कार्यालयाचे स्तरावर सादर करणेत आलेला नसल्याने त्याची पहाणी करता आलेली नाही. यापुढे प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर सादर करुनच त्याची कागदोपत्री संच या कार्यालयास सादर करणेची दक्षता घ्यावी. याबाबत कळविण्यात आलेले होते तथापि त्याची पूर्तता करणेत आलेली नाही. | ऑनलाईन प्रणालीवर सादर करण्यात आलेल्या फॉर्म – I सोबत सादर करण्यात आला आहे. |
| २० | फार्म नं. अ- भाग-१ मध्ये Cost of the project नमुद करणेबाबत कळविण्यात आलेले होते. तथापी त्याची पूर्तता करणेत आलेली नाही. | फार्म नं. अ- भाग-१ मध्ये Cost of the project नमुद करण्यात आली आहे. सोबत सादर करण्यात आला आहे. |
| २१ | प्रस्तावाचे फार्म-अ भाग-१ मध्ये Purpose wise breakup विहित प्रपत्रांत देण्यात आले नाही. तरी खालील प्रपत्रात क्षेत्र विवरण तक्ता देण्यात यावा. याबाबत कळविण्यात आलेले होत तथापी त्याची पूर्तता करणेत आलेली नाही. | फार्म नं. अ- भाग-१ मध्ये Purpose wise breakup, क्षेत्र विवरण तक्ता सोबत सादर करण्यात येत आहे. |
| २२ | सुधारीत प्रस्तावांत क्षेत्र विवरण तक्ता सामील करणेत आलेला दिसून येत नाही तरी यापूर्वी उपस्थित करण्यता आलेला (मुददा क्र. १४- प्रस्तावांतील क्षेत्र विवरण तक्तयामध्ये समाविष्ट होणारे गावाचे जुने सर्व्हे नंबरचा तपशील व त्याकरीता त्या त्या गावाची गट एकत्रिकरण योजना उपलब्ध करून देण्यात यावी जेणेकरुन त्यात्या गावांमधील खाजगी वनाचे क्षेत्राबाबत खात्री करुन ते प्रस्तावातील आखणी मार्गात बाधीत होत आहे अगर कसे? याबावत खात्री करता येईल. तसेच क्षेत्र विवरण तक्त्यायावर प्राधिकृत अधिकारी यांचे नांव व स्वाक्षरीसहित ऑफीसियल सिल असणे आवश्यक आहे) प्रमाणे पूर्तता करुन क्षेत्र विवरण तक्ता प्रस्तावात सामील करणेबाबत कळविण्यात आलेले होते तथापी याची देखील पूर्तता करणेत आलेली नाही. | सुधारीत क्षेत्र विवरण तक्ता, जुने सर्व्हे नंबरचा तपशील व त्याकरीता त्या त्या गावाची गट एकत्रिकरण योजना क्षेत्र विवरण तक्त्यायावर प्राधिकृत अधिकारी यांचे नांव व स्वाक्षरीसहित ऑफीसियल सिल नमूद करून सोबत सादर करण्यात येत आहे. |
| २३ | प्रस्तावात वन हक्क अधिनियम २००६ अंतर्गत विहित प्रपत्रातील जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील प्रमाणपत्र व त्या अनुषंगीक दस्तऐवज आग्ल भाषेत भाषांतरीत करुन प्रस्तावात सामील करणे आवश्यक असल्याबाबत कळविण्यात आलेले आहे. याबाबत पूर्तता करणे आलेली नाही. | वन हक्क अधिनियम २००६ अंतर्गत जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील प्रमाणपत्र बाबत पत्र व्यवहार सुरु असून सदर पत्र व हमीपत्र याची प्रत सोबत सादर करण्यात आली आहे. |

तरी वरील प्रमाणे पूर्तता करून परिपूर्ण प्रस्ताव फेर सादर करण्यात येत आहे.

सहपत्र :- वरील नमूद कागदपत्राच्या प्रती.

o/c कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग,
पेण

प्रत :- मे. एसेन्सी एन्व्हायरो प्रा. लि. यांना माहितीसाठी रवाना. आपणास कळविण्यात येते कि, उप वन संरक्षक, वन विभाग अलिबाग, यांचेकडे संपर्क करून परीपूर्ण प्रस्ताव सादरीकरण करून,तातडीने परवानगी प्राप्त करून घ्यावी.

प्रत :- उप विभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, पेण यांना माहिती व पुढील कार्यावाहीस्तव रवाना.

प्रत :- मे. जे. एम. म्हात्रे इन्फ्रा प्रा. लि. प्लॉट नं. ४९२ , मार्केट यार्ड, सहकार नगर, पनवेल, रायगड यांना माहिती व पुढील कार्यावाहीस्तव रवाना.

प्रत :-मे. ध्रुव कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा. लि. एक्युलीड कन्सल्टन्सी सर्व्हिस एलएलपी. रिव्हेरा को-ऑप हौसिंग सोसायटी, ए विंग, फ्लॅट नं. ००२, ओमेगा, ऋषिवान रिसॉर्ट जवळ, ता.खालापूर, जि. रायगड, यांना माहितीसाठी रवाना.

Scanned with Cam